दूरध्वनी क्रमांक
०२०२५६२२६८०
०२०२५६२२६८८
०२०२५६२२६८९
०२०२५६२२६९०
०२०२५६२२६९१

फॅक्स क्रमांक २५६०११५४

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्वररंग

विद्याविकास

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे ४११००७

---

संदर्भ क्र. विविमं/२०२२–२३/३१३ दिनांक : १४/०१/२०२३

**प्रति,**

**मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित

सर्व महाविद्यालये व परिसंस्था,

विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, पुणे.

**विषय** : आर्ट ऑफ लिव्हिंग प्रणित "EduYouth Meet" दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२३

महोदय/महोदया,

आर्ट ऑफ लिव्हिंगने कोविड काळात युवक, विद्यार्थी तसेच कोविड बाधित रूग्ण, नागरिक व त्यांचे कुटूंबिय यासर्वांसाठी एकत्रितरित्या मनोस्वास्थ्य वर्धन करणारे, आत्मविश्वास पुनर्जागृत करणारे अनेकविध उपक्रम राबवून जनजीवन सुरळीत करण्याच्या दृष्टीने भरीव सहभाग घेतलेला आहे.

आर्ट ऑफ लिव्हिंगच्या या कार्याला केंद्र व राज्य शासन, विविध प्राधिकरणे व संस्था तसेच अनेक विद्यापीठांनी देखिल सकारात्मक मान्यता दिलेली आहे. अशा समाजाभिमूख उपक्रमांचे आयोजन निरंतर व्हावे व शैक्षणिक संस्था, विद्यापीठे व संबंधीत यंत्रणांनी त्यात सहभागी व्हावे या दृष्टीने यु. जी. सी. ने देखिल यापुर्वी निर्देशित केलेले आहे.

यानुसार आर्ट ऑफ लिव्हिंग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व आपल्या प्रथितयश संस्थेच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२३ रोजी सायं ०६.०० ते ०९.०० या कालावधीत पुणे येथे सुर्यकांत काकडे फार्मस्, कोथरूड, पुणे या ठिकाणी १,००,००० (एक लाख) विद्यार्थ्यांचा भव्य युवा मेळावा आयोजित केलेला आहे. या मेळाव्यास आर्ट ऑफ लिव्हिंगचे अध्वर्यु श्री श्री रविशंकर यांच्यासह महाराष्ट्राचे राज्यपाल माननीय भगतसिंह कोश्यारी, आय. सी. सी. आर. चे अध्यक्ष माननीय श्री. विनय सहस्त्रबुद्धे तसेच विविध विद्यापीठांचे माननीय कुलगुरू व माननीय प्र–कुलगुरू या सर्वांच्या उपस्थितीत सुमारे १,००,००० (एक लाख) विद्यार्थी व ५,००० (पाच हजार) शिक्षक प्राध्यापक सहभागी होणार आहेत. सांस्कृतिक कार्यक्रम, तज्ञांचे मार्गदर्शन, उपस्थितांद्वारा अमली पदार्थ विरोधी संकल्प व प्रतिज्ञा आणि श्री श्री रविशंकर यांच्याशी संवाद असे या भरगच्च कार्यक्रमाचे स्वरूप आहे.

या कार्यक्रमात उपस्थितांना प्रशिस्तपत्र मिळणार असून या उपक्रमावर आधारित शैक्षणिक व अकादमिक चाचणीद्वारे विद्यार्थी व प्राध्यापकांना अकादमिक लाभ देण्याचा देखिल आयोजकांचा मानस आहे या कार्यक्रमात वय वर्ष १६ ते ३० या वयोगटातील युवकांना सहर्ष आमंत्रण असून उपस्थितांमध्ये आपल्या प्रथितयश संस्थेच्या उपस्थित प्रतिनिधींचा लक्षणिय सहभाग अपेक्षित आहे.

हा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी आपल्या महाविद्यालयात समन्वय समिती गठित करण्यात यावी. त्यामार्फत अधिकाधिक विद्यार्थ्यांचा या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमात सहभाग सुनिश्चित करावा. ही विनंती. या कामी आपल्या नजिकची स्थानिक आर्ट ऑफ लिव्हिंग शाखा तसेच विद्यापीठाचे प्रस्तूत विभाग यांचे साह्य उपलब्ध आहे.

सोबतच्या आराखड्या प्रमाणे आपल्या स्तरावर समन्वय समिती गठित करावी, समितीचे सदस्य सचिव व सह सचिव यांनी संपर्क प्रमुख म्हणुन संयोजकांशी समन्वय साधावा व या विश्वविक्रमी उपक्रमात यशस्वी सहभाग घ्यावा. कळावे, ही विनंती.

**<u>प्रस्तावित समन्वय समिती.</u>**

<table>
<tr><td>१</td><td>अध्यक्ष</td><td colspan="2">मा. प्राचार्य/संचालक/शाखाप्रमुख</td></tr>
<tr><td>२</td><td>सदस्य</td><td>उप–प्राचार्य पुरूष</td><td rowspan="2">अथवा अध्यक्षांनी निर्देशित केलेले वरिष्ठ शिक्षक प्राध्यापक, इत्यादीपैकी एक पुरूष व एक स्त्री प्रतिनीधी</td></tr>
<tr><td>३</td><td>सदस्य</td><td>उप–प्राचार्य स्त्री</td></tr>
<tr><td>४</td><td>सदस्य सचिव</td><td colspan="2">राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी</td></tr>
<tr><td>५</td><td>सह सचिव</td><td colspan="2">विद्यार्थी कल्याण अधिकारी</td></tr>
<tr><td>६</td><td>सदस्य</td><td colspan="2">शारीरिक शिक्षण संचालक</td></tr>
<tr><td>७</td><td>सदस्य</td><td colspan="2">राष्ट्रीय छात्र सेना केअर टेंकिंग ऑफिसर / अन्य प्रतिनिधी</td></tr>
<tr><td>८</td><td>सदस्य</td><td colspan="2">सांस्कृतिक कार्य अधिकारी</td></tr>
<tr><td>९</td><td>सदस्य</td><td colspan="2">मा. प्राचार्य निर्देशित</td></tr>
<tr><td>१०</td><td>सदस्य</td><td colspan="2">मा. प्राचार्य निर्देशित</td></tr>
</table>

संपर्क :

१. Manisha Chandra 98330 12971

२. Aditya Paranjpe 97638 15548

३. Swati Marathe 93733 14924

४. Vaishnavi Jamdade 98232 52489

५. Vedant Deshpande 95794 04579.

**Email :**

eduyouth@in.artofliving.org



संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ



संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना